# DEPARTMENTAL ACTIVITIES

- Organized College Level Workshop on 'Electoral Literacy' on dated 13 April 2019





## शिवाजी महाविद्यालयात मतदार जनजागृती कार्यक्रम

### मतदान करणे हे प्रत्येक मतदाराचे कर्तव्य- प्रा. डॉ. क्षिरसागर

*कार्यालय प्रतिनिधी/ १२ एप्रिल*

**हिंगोली** : येथील शिवाजी महाविद्यालयात मतदार जनजागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभलेले उपप्राचार्य डॉ. क्षिरसागर यांनी विद्यार्थ्यांना मतदानासंदर्भात मार्गदर्शन केले. मतदान हे मानवाचे.एक महत्वाचे कर्तव्य आहे. लोकशाहीचा एक स्तंभ आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तींनी मतदान करणे गरजेचे आहे. त्यामुळे लोकशाही अधिक मजबुत होऊ शकते. आपल्या भागाचा पर्यायाने देशाचा विकास साध्य होण्यासाठी मतदान महत्वाचे आहे. कारण यातून योग्य व उत्तम व्यक्तिंना आपण प्रतिनिधी म्हणून आपल्या भागाचा निवडून दिला जातो. तो व्यक्ती आपले प्रश्न संसदेच्या सभागृहामध्ये मांडून प्रश्नांची सोडवणूक करीत असतो. यामुळे समाजातील प्रत्येक मतदात्याने मतदान करणे गरजेचे आहे.

मतदान हे सर्वश्रेष्ठ दान असून त्यातून राष्ट्राचे हित जोपासले जाते. राष्ट्रीय कार्य मतदानाच्या मदतीने आपण करीत आहोत हे लक्षात होऊन प्रत्येक विद्यार्थ्याने मतदान करावे. आपल्या समाजातील व कुटुंबातील व्यक्तिला मतदान करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.

याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. मुकटे, प्रा. कांबळे, प्रा. डॉ. इक्बाल जावेद, प्रा. डॉ. भाकरे यांच्यास प्राध्यापकवृंदे, कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

दै. देशोन्नती दि. 13/04/2019

- Organized Invited Lecture on dated 26 November 2022, an Ad.Sahebrao Sirsat, talked on the topic ‘Fundamental Right’






- **Organized One Day National Webinar on 'Relevance of reservation policy and social justice in present day ' on 20 Saptember 2021**






# शिवाजी विद्यालयात आरक्षण धोरण, सामाजिक न्यायावर राष्ट्रीय चर्चासत्र

देशोन्नती वृत्तसंकलन...

**हिंगोली** ■ येथील शिवाजी महाविद्यालयात २० सप्टेंबर रोजी राज्यशास्त्र विभाग व अंतर्गत गुणवत्ता विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आरक्षण धोरण आणि सामाजिक न्यायाची सद्यस्थितीतील प्रासंगिकता या विषयावर एक दिवशीय राष्ट्रीय वेबिणार संपन्न झाला.

यावेळी बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव अंतर्गत महाविद्यालय, प्रताप कॉलेज अमळनेर येथील प्रोफेसर डॉ. विजय तुंटे यानी आपल्या व्याख्यानामध्ये सामाजिक न्यायाच्या प्रस्तापनेसाठी आरक्षण हे महत्वाचे आयूध आहे हे प्रतिपादन केले. ज्या देशामध्ये ४०.२५ टक्के लोक गरीब आहेत. त्या देशाला विकसीत कसे म्हणावे या दुर्लक्षीत वंचित घटकांच्या विकासासाठी आरक्षण महत्वाचे आहे. प्रत्येक जातीमध्ये दोन वर्ग तयार झाले आहेत. यामधील गरीब घटकांच्या विकासासाठी आरक्षण महत्वाचे आहे. भारतीय संविधानद्वारे सामाजिक समता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. व या वेबिनारमध्ये दुसरे व्याख्याते प्रा. डॉ. रमेश शेवाळे संत मुक्ताबाई महाविद्यालय, मुक्ताई नगर येथील व्याख्याते यांनी आरक्षण धोरणा मागील सामाजिक न्यायाचा ताश्चिक विचार मांडत असताना महात्मा फुले यांनी हंटर कमिशनला दिलेल्या निवेदनात आरक्षणाचे बीज आहे असे म्हटले आहे. कोल्हापूर संस्थामध्ये छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी ५० टक्के आरक्षणाची तरतूद करून सामाजिक न्यायावर आधारीत शासन निर्माण केले आहे. पुढे आरक्षणचे धोरण संविधानीक तरतुदीच्या माध्यमातून मांडण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे. या आरक्षणामुळे वर्षानुवर्ष विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित असलेल्या समाज घटकाला विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागाची संधी प्राप्त झाली. वर्तमान स्थितीत आरक्षण धोरणाविषयी संभ्रम तयार केला जातो आहे. त्यापासून आपण सर्वांनी सावध राहण्याची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी या वेबिनारचे उद्घाटन डॉ. विलास आघाव, राज्यशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार हे अध्यक्ष म्हणून होते. कार्यक्रमाचे स्वागत पर भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.जी. गायकवाड, उपप्राचार्य डॉ. क्षिरसागर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुखनंदन ढाले यांनी केले तर सुत्रसंचलन प्रा. डॉ. किशोर इंगोले यांनी केले आणि आभार प्रदर्शन डॉ. रामभाऊ भाकरे यांनी केले. यावेळी कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालया-तील प्रा. डॉ. सुधीर वाघ, डॉ. कऱ्हाळे, डॉ. मुक्टे, डॉ. हुरगुळे, डॉ. सुनिल कांबळे, डॉ. गुणाजी नलगे, डॉ. मुंढे, डॉ. गवळी, डॉ. मुसारे, डॉ. लोंढे, डॉ. शेरकर, डॉ. जाधव, प्रा. खंदारे, प्रा. डॉ. जावेद, डॉ. पवार, प्रा. येवले, प्रा. कावरखे, प्रा. पिंजन, प्रा. शिंदे, प्रा. चौतमल, प्रा. चव्हाण, प्रा. राऊत, प्रा. मोरे, प्रा. परसवाळे, प्रा. काळे, प्रा. घुगे, संगणकाचे काम करणारे प्रा. दिक्षीत इंगोले व उत्तमराव जाधव, पवार, बंडू महाडिक, जरे, राठोड यांनी सहकार्य केले. (शहर प्रतिनिधी)

Thu, 23 September 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/63285679

- **Organized One Day National Conferance on "Contemporary Issues And Challenges For Indian Democracy" on 19 October 2022 (Wednesday)**






## देशोन्नती

### शिवाजी महाविद्यालयात एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद

देशोन्नती वृत्तसंकलन...

**हिंगोली :** येथील शिवाजी महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत एक दिवसीय आंतरविद्याशाखा राष्ट्रीय परिषद १९ ऑक्टोबर बुधवार रोजी आयोजित केली आहे. या परिषदेचा मुख्य विषय हा 'भारतीय लोकशाही समोरील समकालीन समस्या व आव्हाने' असा असून आज भारत देश जगात विकसनशील देश म्हणून ओळखला जातो. त्याचबरोबर सर्वात मोठी लोकशाही ही भारताची आहे.

आधुनिक युगात लोकशाहीला सर्वोत्तम शासन प्रणाली मानण्यात येते. या शासन प्रणालीमुळे सामान्य जनतेचे कल्याण आणि विकास होणे शक्य आहे. आज आपल्या लोकशाहीची सर्वात मोठी समस्या ही आहे की लोकशाहीत राजकारणाला व्यावसायिक रूप दिले जाते ती अनैतिक बनते म्हणूनच तिचा कोणताही धर्म नाही जनतेला भुलविण्यासाठी आपले राजकारणी लोक धर्मविहीनतेला धर्मनिरपेक्षता म्हणतात लोकप्रियतेच्या एक प्रकारे लिलावच होतो. म्हणून लोकशाही म्हणजे झुंडशाही असे म्हणतात लोकशाहीचे जे रूप आज आपणास पाहावयास मिळते ते अत्यंत निराशा जनक आहे. आज नेते स्वतःच लोकशाहीला वाचविण्या साठी मोठमोठ्या गोष्टी करतात पण काम मात्र राजेशाही प्रमाणे करतात अल्पमतात असलेले सरकार फक्त विरोधच करीत बसले ही केवळ समस्या नसून लोकशाहीला मिळालेला शाप आहे. अशा विविध विषयावर या राष्ट्रीय परिषदेतून विचार मंथन होणार आहे असे असले तरी ही लोकशाही समोरील समस्या व आव्हाने हे भरपूर प्रमाणात आहेत. या उद्देशाने या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले .

लोकशाही वर प्रेम करणाऱ्या अभ्यासू वर्गानी परिषदेत सहभाग नोंदवावा असे आयोजकाच्या वतीने विनंती करण्यात येत आहे. या राष्ट्रीय परिषेदेचे उद्घाटक म्हणुन आदर्श कॉलेज हिंगोली चे प्रभारी प्राचार्य तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विलास आघाव तर कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवाजी पवार संस्थापक, तथा माजी शिक्षणाधिकारी हिंगोली हे उपस्थित राहणार आहेत. त्याच बरोबर प्रमुख पाहुणे म्हणून मंदाताई पवार अध्यक्ष शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, डॉ. कांतराव पोले कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय बाभुळगाव लातूर, डॉ. अजय गव्हाणे, यशवंत कॉलेज नांदेड, हे उपस्थित राहणार आहेत. सदर परिषेदेसाठी बीजभाषक म्हणुन डॉ. संदीप तुडूंरवार, बिनझनी नगर कॉलेज, नागपूर हे असणार आहेत. विविध राज्यातून विचारवंत, प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी या राष्ट्रीय परिषदेसाठी उपस्थित राहून विचारमंथन करणार आहेत. तरी आपणही जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. जी. गायकवाड, उपप्राचार्य डॉ. बी. एस. क्षीरसागर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस. यु. ढाले, डॉ. रामभाऊ माकरे यांनी केले आहे. (प्रतिनिधी)

## देशोन्नती

### राजकारणातील नैतिकतेचा ऱ्हास हे लोकशाही समोर आव्हान - डॉ संदीप तुडूंरवार

देशोन्नती वृत्तसंकलन...

**हिंगोली :** येथील शिवाजी महाविद्यालयात १९ ऑक्टोबर रोजी राज्यशास्त्र विभागाच्या वतीने भारतीय लोकशाही समोरील समकालीन समस्या आणि आव्हाने या विषयावर एकदिवशीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आले होते. या परिषदेचे उद्घाटन स्वारातीम मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.विलास आघाव यांच्या हस्ते झाले.

राष्ट्रीय परिषदेसाठी बीजभाषक म्हणून डॉ. संदीप तुडूंरवार ( राज्यशास्त्र विभाग प्रमुख बिनझानी नगर महाविद्यालय, नागपूर) हे उपस्थित होते. त्यांनी आपला बीजभाषणात समकालीन भारतीय राजकारणात नैतिकतेचा ऱ्हास होत असल्याने लोकशाही समोरील समस्या वाढलेल्या आहेत, या समस्या दूर करून भारतीय लोकशाही सदृढ करावयाची असल्यास येथील नागरिकानांनी



जागरूक असणे महत्त्वाचे आहे. भारतीय संविधानाने अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार नागरिकांना दिलेला आहे, परंतु सद्यस्थितीत प्रचलीत व प्रस्थापित व्यवस्थेच्या व सत्ताधाऱ्यांच्या विरोधात बोलणे हा गुन्हा ठरत आहे. अशा पद्धतीने सत्तेचा वापर होत असेल तर भारतीय लोकशाही व्यवस्था कोलमडण्यास वेळ लागणार नाही. स्वातंत्र प्राप्ती नंतर चे नेतृत्वामध्ये जी त्यागाची , देशाप्रती समर्पणाची भावना होती, ती आजच्या लोकप्रतीनिधी मध्ये कमी झाली आहे. राममनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण, मधू लिमये यासारख्या नेतृत्वांमुळे भारतीय लोकशाही ची प्रतिष्ठा टिकून असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. इंग्लंड मध्ये तेथील लोक जागरूक असल्याने तेथील नेतृत्वावर लोकांचा वचक आहे,तेथील राजकारणात नितीमूल्यांना महत्व आहे.असे आपल्या देशात दिसत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

या परिषदेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. कांतराव पोले (वेंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभुळगाव, लातूर) , डॉ. बी. एम. नरवाडे, (श्री दत्त महाविद्यालय, हदगाव) डॉ. विशाल पतंगे, (पीपल्स कॉलेज, नांदेड) डॉ. बालासाहेब जोगदंड,(सीताबाई कॉलेज अकोला) डॉ. डी.जी.नरवाडे (गोदावरी कॉलेज अंबड) डॉ. दत्ताजी मेहत्रे (राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड), डॉ. विरभद्र स्वामी यशवंत कॉलेज, नांदेड) प्राचार्य डॉ. बी जी गायकवाड, उपप्राचार्य डॉ बाळासाहेब क्षिरसागर, डॉ सुखनंदन ढाले आदींची उपस्थिती होती.

या परिषदेच्या उदघाटन समारंभाचे अध्यक्ष व माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार यांनी समारोप केला. राष्ट्रीय परिषदेमध्ये उदघाटन कार्यक्रमानंतर टेक्नीकल सत्रामध्ये डॉ. बी.एम. नरवाडे, यांनी भारतीय लोकशाही समोरील समस्या व आव्हाने यावर मार्गदर्शन केल. डॉ. विशाल पतंगे, ( पीपल्स कॉलेज, नांदेड) यांनी भारतीय लोकशाही च्या यशस्वीतेसाठी सुधारणात्मक उपाययोजना या विषयावर मत मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. किशोर इंगोले, तर प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बी. जी. गायकवाड व आभार डॉ. रामभाऊ माकरे यांनी मानले. (प्रतिनिधी)

Hingoli Edition
Oct 23, 2022 Page No. 3
Powered by : eReleGo.com

- Published wallpaper **'Constitution of India'** on the occasion of Savidhan Divas on dated 26 November 2021

